**प्रेसनोट**

**नाशिक ०५/१२/२०२५**

लोकसेवक अजयभानसिंग गुलाबसिंग परदेशी, वय ४८ वर्षे, व्यवसाय नोकरी, भुकरमापक, वर्ग ३, उपअधीक्षक भुमिअभिलेख, कार्यालय, नेवासा, यांनी लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई केले बाबत..

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| फिर्यादी | सरकार तर्फे श्री. राहुलकुमार नाईक, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.नाशिक |
| पोलीस ठाणे व गुन्हा नोंद कमांक | नेवासा पोलीस स्टेशन, जि.अहिल्यानगर गु.र.नं. १०२०/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७ अ प्रमाणे |
| आरोपीचे नाव वय व कार्यालय | लोकसेवक अजयभानसिंग गुलाबसिंग परदेशी, वय ४८ वर्षे, व्यवसाय नोकरी, भुकरमापक, वर्ग ३, उपअधीक्षक भुमिअभिलेख कार्यालय, नेवासा, जि. अहिल्यानगर, रा. भानोदय बंगला, जनरल अरुण वैदय कॉलनी, जामखेड नाका, नगर जामखेड रोड, भिंगार जि. अहिल्यानगर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,५०,०००/— रुपये ( दिड लाख रुपये ) |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १,५०,०००/— रुपये( दिड लाख रुपये ) |
| थोडक्यात हकीगत— | यातील तकारदार यांचे भाउ, वडील व इतर शेतकरी यांची पाथरवाला— गोयगव्हाण शिवारात शेती असुन तेथे जाण्याकरीता असलेल्या शीव रस्त्यावर अतिकमण असल्याने तकारदार यांचे भाउ व इतर शेतकरी यांनी नमुद शीवरस्ता खुला करण्यासंदर्भात तहसिलदार नेवासा, यांचेकडे दिनांक ३१/०१/२०२२ रोजी अर्ज केला होता त्यावर तहसिलदार यांनी मोजणीचे आदेश देवुन मोजणीचा खर्च अर्जदार शेतकरी यांनी भरावा असे आदेश दिले होते. या आदेशाविरुध्द तकारदार यांचे भाउ व इतर शेतकरी यांनी मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केले होते व त्यावर मा. उच्च न्यायालयाने शीव रस्ता खुला करण्याकरीता मोजणीसाठी येणारा खर्च अर्जदार यांचेकडुन न घेता शासनाने करावा असे आदेश दिले होते.<br>त्यानुसार सदरच्या शीवरस्ता मोजणी करुन फेब्रुवारी २०२३ मध्ये सर्वांकरीता खुला करण्यात आला, त्यानंतर मार्च २०२५ मध्ये रस्त्याचे मजबुती करण्याचे काम मंजुर झाले. व त्यावेळी गट कमांक ३० तसेच पाथरवाल्यातील काही शेतकऱ्यांनी पुन्हा मोजणी करावयाचे असलेबाबत भुमिअभिलेख कार्यालय नेवासा येथे अर्ज करुन मोजणी फी भरली.<br>त्यानंतर दिनांक ०६/०६/२०२५ रोजी मोजणी अधिकारी श्री. जयदिप गाढे यांनी सदर गटाचे मोजणी केली व शीव रस्त्याच्या मधोमध खुणा दाखविल्या व त्यामुळे शीव रस्ता वापराकरीता बंद झाला.<br>तकारदार यांच्या भावाने दिनांक ३०/०६/२०२५ रोजी पुन्हा भुमिअभिलेख कार्यालय नेवासा, येथे मोजणी संदर्भात तकारी अर्ज केला होता. त्यावेळी भुकरमापक जयदिप गाढे यांनी तकारदाराकडे पुर्ववत मोजणी करुन देण्याकरीता दोन लाख रुपये मागितले व त्याबाबत पुढील काही बोलणे असल्यास त्याच कार्यालयातील त्यांचे सहकारी भुकरमापक अजयभानसिंग परदेशी यांचेशी बोलण्यास सांगितले. त्यानुसार जयदिप गाढे यांनी मा. उच्च न्यायालयाचे आदेशानंतर जी मोजणी झाली होती त्यानुसार मोजणी केली. त्यानंतर परदेशी यांनी आपल्या वैयक्तिक प्रभावाचा वापर करुन स्वतःचा फायदा करुन घेण्याचे हेतुने कायदेशिर पारिश्रमाखेरीज अन्य पारितोषण म्हणुन बेकायदेशिर मार्गाने बक्षीस म्हणुन तकारदार यांचेकडे दिनांक ०३/१२/२०२५ रोजी दिड लाख रुपयांची लाच मागुण ती दिनांक ०४/१२/२०२५ रोजी सदर लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली असता त्यास रंगेहाथ पकडण्यात आले व त्यांचेविरुध्द वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| सापळा कारवाई | सापळा अधिकारी :— श्री. राहुलकुमार नाईक, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., नाशिक<br>सापळा पथक :— पोहवा/प्रफुल्ल माळी, पोहवा/विलास निकम, चापोहवा/विनोद पवार सर्व नेम. ला.प्र.वि.नाशिक.<br>तपासी अधिकारी:— श्री. राजु आल्हाट, पोलीस निरीक्षक ला.प्र.वि. अहिल्यानगर |
| मार्गदर्शन | १) मा.श्री.भारत तांगडे, पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>२) मा.श्री.माधव रेड्डी, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र नाशिक.<br>३) मा.श्री.सुनिल दोरगे, अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>४) मा.श्री.अजित त्रिपुटे, पोलीस उप अधीक्षक , ला.प्र.वि. अहिल्यानगर |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक.
संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in
ई मेल/ऑनलाईन तकार :— spacbnashik@mahapolice.gov.in, dyspacba.nagar@gmail.com
टोल फ्री कमांक :— **१०६४**
दुरध्वनी कमांक :— ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्सअप कं. :— ९९३०९९७७००